
# प्रकरण – ७ : भारतातील बेरोजगारी




आकृती ७.१ भारतातील बेरोजगारी

**प्रस्तावना :**

भारत हा विकसनशील देश आहे आणि जगात वेगाने वाढणारी एक अर्थव्यवस्था आहे. भारताच्या विकासामध्ये बेरोजगारीची समस्या हे एक मोठे आव्हान आहे. आकृती क्र.७.१ वरून भारतातील बेरोजगारीच्या समस्येची कल्पना येते. बेरोजगारीमुळे मानवी साधनसंपत्ती वाया घालवण्यासारखे आहे. दीर्घकालीन बेरोजगारी ही मोठ्या प्रमाणावर वाढणारे दारिद्र्य व संथ गतीने होणारा आर्थिक विकास दर्शविते. बहुतांश तरुणांना बेरोजगारीस सामोरे जावे लागते. तरुण वर्ग ही मोठी मानवी साधनसंपत्ती, आर्थिक विकास व तांत्रिक नवकल्पनेची चालकशक्ती व गुरुकिल्ली आहे. भारत हा तरुणांचा देश आहे. म्हणून तरुणातील बेरोजगारी हे २१ व्या शतकातील भारतासमोरील मोठे आव्हान आहे. रोजगार संधी व लोकसंख्येतील वाढ यांमध्ये असमतोल दिसून येतो. यामुळे मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी वाढली आहे. बेरोजगार, अनुत्पादक समाज विघातक आणि देशविरोधी कामात गुंतलेली दिसतात.

**बेरोजगारीची अर्थ :**

साधारणपणे ज्याला उत्पादकीय प्रक्रियेत कोणताही लाभ होत नाही त्यास बेरोजगारी असे म्हणतात. अर्थशास्त्रात बेरोजगारी ही या संदर्भात अभ्यासता येते.

अ) कामाचे स्वरूप

ब) काम करणारा वयोगट

क) श्रमाची मागणी व पुरवठा

ड) प्रचलित वेतनदर

वाढत्या श्रमाचा वेग या संदर्भात अभ्यासता येतो. त्यामुळे आर्थिक वृद्धीचा दर पुरेसा वेगवान नाही.

'बेरोजगारीचा अर्थ असा की, ज्या परिस्थितीत १५ ते ५९ वयोगटांतील व्यक्तींना प्रचलित वेतनदरावर काम करण्याची इच्छा व पात्रता असूनही रोजगार मिळत नाही'.

एका व्यक्तीस रोजगार असणे म्हणजे ती व्यक्ती आठवड्यातले किमान काही तास काम करत असली पाहिजे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्थेच्या (N.S.S.O.) सांख्यिकीय माहितीनुसार,

१) भारतात एखादी व्यक्ती दर आठवड्याला १४ तासांपेक्षा कमी काम करते. अशा व्यक्तीस बेरोजगार म्हणतात.

२) जे १५-२८ तास दर आठवड्याला काम करतात त्यांना न्यून रोजगार म्हणतात.

३) जी व्यक्ती दररोज आठ तास म्हणजे प्रत्येक वर्षाला २७३ दिवस काम करते त्यांना रोजगार असलेल्या व्यक्ती म्हणतात.

**तुम्हांला माहीत हवं :**

**१) अनैच्छिक बेरोजगारी :** ही बेकारी म्हणजे अशी एक अवस्था की लोकांची काम करण्याची पात्रता असते आणि काम करायला तयार असतात, परंतु त्यांना काम प्राप्त होत नाही.


**२) ऐच्छिक बेरोजगारी :** जेथे व्यक्ती काम करण्यासाठी पात्र असते, परंतु त्याची काम करण्याची इच्छा नसते.

**३) अर्धबेकारी :** अर्धबेकारी ही अशी स्थिती होय की जेथे व्यक्तीची काम करण्याची क्षमता पूर्णपणे वापरली जात नाही किंवा कनिष्ठ पातळीवर काम करावे लागते.

**४) पूर्ण रोजगार :** पूर्ण रोजगार ही अशी गृहीत स्थिती आहे ज्यामध्ये सर्व उपलब्ध संसाधने अतिशय कार्यक्षमतेने कार्यरत असतात.

**बेरोजगारीचे प्रकार :**

बेरोजगारीचे विविध प्रकार आहेत. त्यांचे वर्गीकरण खालील प्रकारे करता येते.




**अ) ग्रामीण बेरोजगारी :**

ग्रामीण भागातील बेरोजगारीला ग्रामीण बेरोजगारी म्हणतात. ग्रामीण बेरोजगारीचे दोन प्रकार आहेत.

**१) हंगामी बेरोजगारी :** हंगाम नसलेल्या काळात जेव्हा लोकांना रोजगार नसतो त्याला हंगामी बेरोजगारी म्हणतात. शेतकऱ्यांना पिकांच्या लागवडीसाठी पावसावर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे शेती हा हंगामी व्यवसाय आहे. शेती क्षेत्रातील श्रमशक्ती जवळपास ५ ते ७ महिन्यांसाठी बेरोजगार राहते. शेतीशिवाय स्थलपरत्वे हंगामी बेरोजगारी ही पर्यटन मार्गदर्शक, बँड पथक, साखर कारखाना कामगार, बर्फ फॅक्टरी कामगार व मासेमारी इत्यादी व्यवसायांमध्ये आढळून येते.

**२) छुपी/प्रच्छन्न बेरोजगारी :** सामान्यत: भारतातील खेड्यांमध्ये ही बेरोजगारी आढळते. ही एक अशी स्थिती आहे की ज्यामध्ये गरजेपेक्षा जास्त लोक काम करताना दिसतात. त्यापैकी काही मजुरांना कामावरून कमी केले तरी उत्पादनावर त्याचा परिणाम होत नाही. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर ती एका विशिष्ट स्थितीशी संबंधित आहे, जिथे अतिरिक्त मनुष्यबळ असून त्यामध्ये काही मजुरांची सीमांत उत्पादकता शून्य असते.

शेतजमिनीवरचा अतिरिक्त भार हा ग्रामीण भागात छुपी बेरोजगारी निर्माण करतो. ग्रामीण भागात जवळपास २०% श्रमशक्ती छुप्या बेरोजगारीत आहे. संयुक्त कुटुंब पद्धती, पर्यायी रोजगारांचा अभाव, शेतीवरील लोकसंख्येचा अतिरिक्तभार इत्यादी छुप्या बेकारीची कारणे आहेत.



अ) पाच कामगार = दहा क्विंटल ज्वारी    आ) सोळा कामगार = दहा क्विंटल ज्वारी

आकृती ७.२ : छुपी/प्रच्छन्न बेरोजगारी

### ब) नागरी बेरोजगारी :

शहरी भागात जे बेरोजगार आढळतात, त्यास नागरी बेरोजगारी म्हणतात. खालीलप्रमाणे नागरी बेरोजगारीचे प्रकार आहेत.

१) **सुशिक्षित बेरोजगारी :** काम करण्याची इच्छा आणि शिक्षणाची पात्रता असूनही रोजगार मिळत नाही त्यास सुशिक्षित बेरोजगारी म्हणातात. ही बेरोजगारी शालान्त परीक्षा उत्तीर्ण, पदवीपूर्व शिक्षण, पदवीधारक व पदव्युत्तरांमध्ये दिसून येते. शिक्षणाप्रती उदासिनता, पांढरपेशा व्यवसायाला प्राधान्य, व्यावसायिक अभ्यासक्रमाचा अभाव, रोजगाराच्या संधी व सुशिक्षितांमधील असमतोल, उपलब्ध शैक्षणिक संधींची माहिती नसणे ही सुशिक्षित बेरोजगारीची कारणे आहेत.

२) **औद्योगिक बेरोजगारी :** शहरातील कारखाने व उद्योगांमधील बेरोजगारीस औद्योगिक बेरोजगारी म्हणतात. हे कामगार कुशल किंवा अकुशल असतात. हा सामान्यत: खुल्या बेरोजगारीचा प्रकार आहे. मंद औद्योगिक वृद्धी, वेगाने वाढणारी लोकसंख्या, प्रशिक्षण सुविधांचा अभाव, आधुनिक तंत्रज्ञानाची कमी स्वीकार्यक्षमता, उद्योगांचे गैरसोयीचे स्थानिकीकरण, श्रमाची कमी गतिशीलता ही औद्योगिक बेरोजगारीची मुख्य कारणे आहेत.

### औद्योगिक बेरोजगारीचे खालील प्रकार आहेत :

अ) **तांत्रिक बेरोजगारी :** तंत्रज्ञानातील बदलांमुळे तांत्रिक बेरोजगारी निर्माण होते. आधुनिक तंत्रज्ञान भांडवल प्रधान असून त्यास कमी कामगार लागतात. जेव्हा आधुनिक तंत्रज्ञानांचा स्वीकार औद्योगिक क्षेत्रात केला जातो. प्रशिक्षणाचा अभाव असल्याने कामगार आपल्या नोकरीवरून विस्थापित होतात. उदा. संगणकाचा वापर, यांत्रिक तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी.

ब) **संघर्षजन्य बेरोजगारी :** उद्योगांमधील संघर्षामुळे निर्माण होणारी बेरोजगारी म्हणजे संघर्षजन्य बेरोजगारी होय. ह्या प्रकारची बेरोजगारी यांत्रिक बिघाड, वीजटंचाई, कच्च्या मालाचा अभाव, कामगारांचा संप इत्यादींमुळे निर्माण होते. संघर्षजन्य बेरोजगारी ही तात्पुरत्या स्वरूपाची असते.

क) **चक्रीय बेरोजगारी :** व्यापारचक्रातील तेजी-मंदीपैकी मंदीच्या परिस्थितीत निर्माण होणाऱ्या बेकारीस चक्रीय बेकारी म्हणतात. मंदीच्या काळात प्रभावी मागणी घटते त्यामुळे उत्पादकांचा नफा आणि किमतीमध्ये घट होते. परिणामी उत्पादक गुंतवणूक व वस्तूंच्या उत्पादनात घट करतो. उत्पादनात घट झाल्याने रोजगारात घट होते. परिणामी कामगारांना बेरोजगारीस सामोरे जावे लागते.

ड) **संरचनात्मक बेरोजगारी :** देशाच्या आर्थिक संरचनेत काही लक्षणीय बदलांमुळे ही बेरोजगारी निर्माण होते. हे बदल उत्पादन घटकांच्या मागणी व पुरवठ्यावर परिणाम करू शकतात. अर्थव्यवस्थेमधील मूलभूत बदल, सरकारी धोरणांमध्ये झालेले बदल, भांडवलाचा तुटवडा, उद्योगाचे एका क्षेत्रापासून दुसरीकडे झालेले स्थलांतर इत्यादी. ही एक दीर्घकालीन अवस्था आहे. उपलब्ध रोजगार व कामगारांचे कौशल्य यातील तफावतीमुळे संरचनात्मक बेरोजगारी निर्माण होते. उदा.१) घोडागाडीची जागा आता ऑटोरिक्षाने घेतली आहे. २) संगणकामुळे टंकलेखक बेरोजगार झाले कारण त्यांचे कौशल्य व उपलब्ध रोजगारात तफावत आहे.

**भारतातील बेरोजगारीचा विस्तार : रोजगार आणि बेरोजगारी (लाख)**

| वर्ष | कामगार शक्ती | श्रम शक्ती | बेरोजगारी | बेरोजगारीचा दर (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|
| १९९३-१९९४ | ३८१.९४ | ३७४.४५ | ७.४९ | २.० |
| १९९९-२००० | ४०६.८५ | ३९७.८८ | ८.९७ | २.२ |
| २००४-२००५ | ४६८.७३ | ४५७.५६ | ११.१७ | २.४ |
| २००९-२०१० | ४७२.३२ | ४६२.४९ | ९.८४ | २.१ |
| २०११-२०१२ | ४८३.७५ | ४७२.९१ | १०.८४ | २.२ |

**तक्ता क्र.७.१** **स्त्रोत :** इकॉनॉमिक व पोलिटिकल वीकली (७ जून २०१४)

**तुम्हांला माहीत आहे का?**

**राज्यानिहाय भारतातील बेरोजगारीचे दर (२०१५-१६)**

| क्रमांक | राज्य | बेकारीचा दर (प्रति १०००) | क्रमांक | राज्य | बेकारीचा दर (प्रति १०००) |
|---|---|---|---|---|---|
| १ | त्रिपुरा | १९७ | १६ | मणिपूर | ५७ |
| २ | सिक्कीम | १८१ | १७ | ओडिशा | ५० |
| ३ | केरळ | १२५ | १८ | पश्चिम बंगाल | ४९ |
| ४ | हिमाचल प्रदेश | १०६ | १९ | मेघालय | ४८ |
| ५ | आसाम | ९६ | २० | हरियाणा | ४७ |
| ६ | अरुणाचल प्रदेश | ८९ | २१ | मध्यप्रदेश | ४३ |
| ७ | नागालँड | ८५ | २२ | तामिळनाडू | ४२ |
| ८ | झारखंड | ७७ | २३ | आंध्रप्रदेश | ३९ |
| ९ | उत्तरप्रदेश | ७४ | २४ | मिझोराम | ३० |
| १० | जम्मू आणि काश्मीर | ७२ | २५ | तेलंगण | २८ |
| ११ | राजस्थान | ७१ | २६ | महाराष्ट्र | २१ |
| १२ | उत्तराखंड | ७० | २७ | छत्तीसगड | १९ |
| १३ | गोवा | ६१ | २८ | कर्नाटक | १५ |
| १४ | पंजाब | ६० | २९ | गुजरात | ०९ |
| १५ | बिहार | ६० | | | |

**स्त्रोत :** रोजगार-बेरोजगारीचा पाचवा वार्षिक सर्वेक्षण अहवाल (२०१५-१६), भारत सरकार

**शोधा पाहू :**

वरील तक्त्याच्या क्रमांकाच्या आकडेवारीच्या आधारे दुसरे चतुर्थक ($Q_2$) काढा आणि मध्यभागी येणाऱ्या राज्याचे विभाजन मूल्य शोधा.

## बेरोजगारीची कारणे :

१) **रोजगारविरहित वाढ :** भारतातील रोजगाराच्या वाढीचा दर हा आर्थिक वृद्धीपेक्षा फार कमी आहे. वाढत्या श्रमशक्तीला सामावून घेण्याइतका तो पुरेसा नाही. त्यामुळे बेरोजगारी प्रचंड वाढलेली आहे.

२) **श्रमशक्तीतील वाढ :** मृत्यूदर वेगाने घटला असताना जन्मदर मात्र त्याच प्रमाणात कमी न झाल्याने देशाची लोकसंख्या मात्र वाढली आहे. यामुळे श्रमशक्तीचा विस्तार झालेला असून त्यातून बेरोजगारी वाढलेली आहे.

३) **यांत्रिकीकरणाचा अतिरिक्त वापर :** भारतात मनुष्यबळ मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. कार्यक्षमतेने काम करणाऱ्या मनुष्यबळामुळे देशाकडे श्रमप्रधान उत्पादनाचे तंत्र वापरणे सोईचे असते. परंतु, उद्योगाबरोबरच शेतीक्षेत्रात देखील कामगाराच्या जागी भांडवलाचा वापर होत आहे. जिथे भांडवल मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे आणि मनुष्यबळ मर्यादित आहे तिथे स्वयंचलित यंत्रांचा वापर योग्य ठरतो. इतर अत्याधुनिक तंत्रज्ञानही तर्कसंगत व न्याय्य आहे, पण भारतासारख्या देशात अशा धोरणामुळे बेरोजगारीत वाढ होत आहे.

४) **कौशल्य विकास कार्यक्रमाचा अभाव :** भारताच्या लोकसंख्येचा मोठा भाग अशिक्षित व अकुशल मनुष्यबळाचा आहे. भारतीय उद्योगांना पूरक असे शैक्षणिक अभ्यासक्रम मर्यादित स्वरूपात उपलब्ध आहेत. व्यावसायिक व कौशल्य विकास अभ्यासक्रमाची कमतरता असल्यामुळे उद्योगांना लागणारे कुशल मनुष्यबळ उपलब्ध होत नाही.

५) **रोजगाराची अपेक्षा :** भारतातील सुशिक्षित बेरोजगार

पांढरपेशा व्यवसायात नोकरी करण्यास तयार असतात. नावीन्यपूर्ण व उद्यमशीलतेच्या कमतरतेमुळे स्वयंरोजगाराचा अभाव दिसून येतो. जोपर्यंत अपेक्षित पगार आणि कामाच्या स्वरूपानुसार रोजगार मिळत नाही तोपर्यंत पदवीधारक बेरोजगार राहण्यास पसंत करतात.

६) **शेतीचे हंगामी स्वरूप :** भारतातील शेती हा व्यवसाय हंगामी स्वरूपाचा आहे. शेती पावसावर अवलंबून आहे. जलसिंचनाच्या सुविधांचा अभाव, कमी प्रतीची सुपीक जमीन, कालबाह्य उत्पादन तंत्र, प्रमाणित बियांणांची व खतांची कमतरता असल्यामुळे शेतीची उत्पादकता कमी झाली आहे. वर्षातून काही महिन्यांसाठी रोजगार मिळतो आणि काही महिने रोजगार उपलब्ध नसतो, त्यामुळे शेतमजुरांच्या श्रमशक्तीचा वापर होत नाही.

७) **आर्थिक विकासाचा कमी दर :** भारताचा एकूण आर्थिक विकास दर कमी आहे. औद्योगिक विस्ताराच्या अभावामुळे सिंचनाच्या सुविधांचा अभाव, खते, पायाभूत सुविधांचा अभाव निर्माण होतो. याचा परिणाम म्हणजेच रोजगाराच्या संधी ग्रामीण क्षेत्रात पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने वाढत्या श्रमशक्तीला सामावून घेऊ शकत नाही.

८) **ग्रामीण लोकसंख्येचे स्थलांतर :** रोजगाराच्या शोधासाठी ग्रामीण भागातून नागरी भागात लोकसंख्येचे सातत्याने स्थलांतर होत आहे. त्यामुळे नागरी भागात बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे.

**तुम्हांला माहीत हवं :**

**बेरोजगारीचे परिणाम**

| **आर्थिक परिणाम** | **सामाजिक परिणाम** |
|---|---|
| १) मानवी संसाधनाचा अपव्यय | १) सामाजिक तणाव आणि अशांतता |
| २) कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीचा अभाव | २) मानवी मूल्यांचा ऱ्हास |
| ३) दारिद्र्य व उत्पन्न विषमता | ३) अगतिकता |
| ४) अनौपचारिक क्षेत्राची वाढ | |
| ५) अनुत्पादक लोकसंख्येचा वाढता भार | |

**तुम्हांला माहीत हवं :**

**बेरोजगारी कमी करण्याचे सामान्य उपाय**

१) शेती क्षेत्राचा विकास
२) पर्यायी व्यवसायाची सोय
३) पायाभूत सुविधांचा विकास
४) शिक्षण पद्धतीतील सुधारणा
५) पर्यटनाचा विकास
६) श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा वापर
७) माहिती तंत्रज्ञान व संदेशवहनाचा विस्तार
८) व्यावसायिक प्रशिक्षण व कौशल्य विकासासाठी तरतूद
९) ग्रामीण औद्योगीकरण
१०) स्वयंरोजगाराला प्रेरणा

**भारतातील बेरोजगारी कमी करण्यासाठी शासनाने केलेल्या विशेष उपाययोजना :**

१) **रोजगार हमी योजना (EGS) :** रोजगार हमी योजना ही सर्वप्रथम महाराष्ट्र सरकारने २८ मार्च १९७२ रोजी सुरू केली. याचा प्रमुख उद्देश ग्रामीण जनतेसाठी उत्पादनक्षम रोजगार पुरविणे असून, ग्रामीण बेरोजगाराची व दारिद्र्याची समस्या सोडविणे हा आहे. या योजनेअंतर्गत सरकारने किमान रोजगार पुरविण्याची हमी दिलेली आहे. या योजनेचे महाराष्ट्रातील यश पाहता भारतातील इतर राज्यांनी ही योजना अंमलात आणली आहे.

२) **स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना (SGSY) :** ही योजना एप्रिल १९९९ मध्ये एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP) व इतर योजनांचे पुनर्गठन करून सुरू करण्यात आली आहे. ही ग्रामीण भागातील गरिबांसाठी एकमेव स्वयंरोजगार योजना आहे.

३) **स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना (SJSRY) :** ही योजना डिसेंबर १९९७ मध्ये सुरू झाली आहे. ही योजना शहरी बेरोजगारांना व अर्ध रोजगारांना फायदेशीर रोजगार पुरविते. यामध्ये स्वयंरोजगार, महिला स्वयं रोजगार कार्यक्रम, रोजगार प्रोत्साहनासाठी कुशल प्रशिक्षण व

शहरी वेतन रोजगार कार्यक्रम सामावलेले आहेत.या योजनेसाठी केंद्र सरकार ७५% व राज्य सरकार २५% खर्च करते.

४) **प्रधानमंत्री रोजगार योजना (PMRY) :** ही योजना १९९३ पासून लागू केली असून या योजनेअंतर्गत लाखो सुशिक्षित बेरोजगार तरुणांना शाश्वत स्वरूपाच्या स्वयं रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

५) **ग्रामीण युवक प्रशिक्षण व स्वयंरोजगार योजना (TRYSEM) :** ग्रामीण तरुणांमध्ये बेरोजगारीची समस्या सोडविणे या उद्देशाने या योजनेचा प्रारंभ १९७९ साली झाला. तसेच या योजनेचे ध्येय साधारणतः २ लाख ग्रामीण युवकांना दरवर्षी प्रशिक्षण देऊन त्यांना स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त करणे हे आहे. TRYSEM ही योजना स्वर्णजयंती ग्राम स्वयं रोजगार योजनेत १९९९ मध्ये विलीन करण्यात आली.

६) **जवाहर रोजगार योजना (JRY) :** मागासलेल्या १२० जिल्ह्यांना रोजगार पुरविण्याच्या हेतूने १ एप्रिल १९८९ मध्ये सरकारने जाहीर केलेली नवीन वेतन रोजगार योजना म्हणजे जवाहर रोजगार योजना होय. एप्रिल १९९९ पासून ही योजना ग्रामीण भागासाठी मर्यादित राहून जवाहर ग्राम समृद्धी योजना (JGSY) या नावाने ओळखली जाते.

७) **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGS) :** २ ऑक्टोबर २००९ पासून राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे नाव महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना असे करण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत एका वित्तीय वर्षात ग्रामीण भागाच्या प्रत्येक कुटुंबातील किमान एक प्रौढ व्यक्तीला अकुशल स्वरूपाचे काम उपलब्ध करून देण्याची हमी व किमान १०० दिवस वेतन देण्याची हमी दिली जाते.

८) **दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना–२०१४ :** ग्रामीण विकास मंत्रालयाने २३ सप्टेंबर २०१४ रोजी कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमाशी संलग्न असलेली ही एक महत्त्वाची योजना जाहीर केली. या योजनेचे ध्येय दारिद्र्य कमी करणे, फायदेशीर व शाश्वत रोजगार नियमित वेतन देऊन पुरविणे असा आहे. या कार्यक्रमाअंतर्गत गरीब कुटुंबातील १५–३५ वयोगटाच्या ग्रामीण युवकांना तीन महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर नियुक्ती दिली जाते.

९) **कौशल्य विकास आणि उद्योजकता विकासासाठीचे राष्ट्रीय धोरण (२०१५) :** कौशल्य विकासासाठी पहिले राष्ट्रीय धोरण २००९ मध्ये जाहीर करण्यात आले. हे धोरण खाजगी क्षेत्रातील सहभागी नवउपक्रमशील उपक्रमांना प्रोत्साहन देते.

या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे संयोजन कौशल्य वाढवून विविध घटकांना बळकटी देणे हा असून यात खालील बाबींचा समावेश होतो.

१) उद्योजकशील संस्कृतीला प्रोत्साहन देणे.

२) उद्योजकांना प्रोत्साहन देऊन उद्योग व्यवसायाचे पर्याय उपलब्ध करून देणे.

३) महिलांना उद्योगशील बनण्यास प्रोत्साहन देणे.

१०) **स्टार्ट अप इंडिया पुढाकार :** स्टार्ट अप इंडिया पुढाकार हा उपक्रम शासनाने जानेवारी २०१६ मध्ये सुरू केला. भारतातील होतकरू आणि प्रतिभासंपन्न तरुणांना प्रोत्साहित करण्यास व उद्योग उभारण्यास बळ देणारी एक नावीन्यपूर्ण आणि जनकल्याणकारी बाब आहे.

११) **प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (२०१६–२०२०) :** या योजनेचा मुख्य उद्देश तरुणांमध्ये कौशल्य विकास करणे हा आहे. या योजनेअंतर्गत युवकांना यशस्वीरीत्या कौशल्यविकास प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केल्याबद्दल मोबदला पैशांच्या स्वरूपात देऊन कौशल्यविकासास प्रोत्साहन दिले जाते. यासाठी शासनाने २०२० पर्यंत ₹ १२ हजार कोटींची तरतूद केली आहे.

**प्र. १. विसंगत शब्द ओळखा :**

१) शहरी भागातील बेकारी –
सुशिक्षित बेकारी, औद्योगिक बेकारी, छुपी बेकारी, तांत्रिक बेकारी

२) राज्यांचा बेरोजगारीच्या दराचा चढता क्रम–
गोवा, पंजाब, महाराष्ट्र, त्रिपुरा

३) रोजगार हमी योजना १९७२,
जवाहर रोजगार योजना १९८९,
स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना १९९९,
पर्यटनाचा विकास

**प्र. २. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून स्पष्ट करा :**

१) हुसेन शेख यांनी त्यांच्या शेतातील काम यावेळेस आधीपेक्षा सात मजूर कमी वापरून केले तरी उत्पादन तेवढेच राहिले.

२) नवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे छपाई उद्योगात अनेक कामगारांचे रोजगार कमी झाले.

३) सतिशचे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झाले आहे व तो आतुरतेने नोकरीच्या प्रतिक्षेत आहे.

४) महाराष्ट्रातील काही भागांत फक्त खरिपाची पिकेच होतात त्यामुळे या भागातील रोजगार ऑक्टोबरपर्यंत असतो.

**प्र. ३. सहसंबंध पूर्ण करा :**

१) हंगामी बेरोजगारी : पर्यटन मार्गदर्शक :: ____ पदवीधारक


२) ____ प्रच्छन्न बेरोजगार :: नागरी बेरोजगारी : औद्योगिक बेरोजगारी

३) संघर्षजन्य बेरोजगारी : कच्च्या मालाचा अभाव :: ____ व्यवसायातील चढ-उतार

४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGS) : वेतनाची हमी देणारा रोजगार :: ग्रामीण तरुणांसाठी स्वयं रोजगार व प्रशिक्षण (TRYSEM) : ____

५) ____ संसाधनाचा अपव्यय :: सामाजिक परिणाम : मानवी मूल्यांचा ऱ्हास

**प्र. ४. खालील तक्त्याचे निरीक्षण करून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**




१) एक ज्यादा कामगार कामावर घेतल्याने उत्पादनात वाढ होत नाही आणि कामगाराला कमी केल्यास उत्पादनात घटही होत नाही ही कोणत्या प्रकारची बेरोजगारी आहे.

२) संगणकाच्या वापरामुळे कामगाराला कामावरून कमी केले ही कोणत्या प्रकारची बेरोजगारी आहे.

३) माहिती क्षेत्रातील मंदीमुळे शरद अमेरिकेतून भारतात परत आला. ही कोणत्या प्रकारची बेकारी आहे.

४) पदवीधर असूनही वसंत घरी बसून आहे.

**प्र. ५. खाली दिलेल्या बेरोजगारीच्या दराच्या आधारे पहिले चतुर्थक ($Q_१$) आणि तिसरे चतुर्थक ($Q_३$) काढा :**

| वर्ष | बेरोजगारीचा दर % |
|---|---|
| २००९ | ३.७५ |
| २०१० | ३.५४ |
| २०११ | ३.५३ |
| २०१२ | ३.६२ |
| १०१३ | ३.४६ |
| २०१४ | ३.४१ |
| २०१५ | ३.४९ |
| २०१६ | ३.५१ |
| २०१७ | ३.५२ |

**प्र. ६. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

१) औद्योगिक बेरोजगारीचे प्रकार स्पष्ट करा.

२) भारतातील बेरोजगारीची कारणे स्पष्ट करा.

३) बेकारी कमी करण्यासाठी शासनाने केलेल्या उपाययोजना स्पष्ट करा.

◈◈◈